मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दि. 10 जून 2026 | पान- 1

# चिखली-कुदळवाडीत अतिक्रमण कारवाई

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली-कुदळवाडी परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबवत काही अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मंगळवारी पहाटे चिखली-कुदळवाडी परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबवत काही अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. मात्र, या कारवाई दरम्यान एकाच समाजाशी संबंधित पाच धार्मिक स्थळे पाडण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कारवाईपूर्वी स्थानिक रहिवाशांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांना निवेदन सादर करून अतिक्रमण हटविताना पारदर्शकता राखावी तसेच कोणत्याही एका समाजाला लक्ष्य करण्यात येऊ नये, अशी मागणी केली होती. तथापि, निवेदन दिल्यानंतर अवघ्या काही तासांत पहाटेच्या सुमारास कारवाई करण्यात आल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील सर्व अतिक्रमणांवर समान निकषांनुसार कारवाई होणे अपेक्षित असताना निवडक बांधकामांवरच हातोडा चालविण्यात आला. त्यामुळे संबंधित कारवाईबाबत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

याप्रकरणी नागरिकांनी पुढील कायदेशीर पर्यायांचा अवलंब करण्याचा इशारा दिला असून, सर्व अतिक्रमणांवर एकसमान धोरण राबविण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

दरम्यान, विशिष्ट समाजाला लक्ष्य केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत असला तरी या आरोपांबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या कारवाई मागील नेमकी कारणे आणि प्रशासनाची बाजू स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

> **शहरातील अनधिकृत बांधकामांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामांना अभय दिले जाणार नाही. कायद्याचे पालन अबाधित राखण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने राबविण्यात येतील. नागरिकांनीही बांधकाम करण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या घेऊनच पुढील कार्यवाही करावी.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त,**
> **पिंपरी चिंचवड महापालिका.**

> **या कारवाईवेळी तणावपूर्ण वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेऊन कारवाई पार पाडल्याचा दावा केला. तसेच, शहरात ब-याच ठिकाणी अनधिकृत बांधकामे आहेत. त्यात इतरही धार्मिकस्थळांचा समावेश आहे. त्यावरही कारवाई करण्यात येणार आहे.**
>
> **- रवि लांडगे, महापौर,**
> **पिंपरी चिंचवड महापालिका.**

---

# तळेगाव एमआयडीसीतील कंपनीत गॅस गळती; 2 कामगारांचा मृत्यू

## घटना मंगळवारी तळेगाव एमआयडीसी फेज-1 येथील शाफलर इंडिया कंपनीत घडली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव एमआयडीसीतील एका कंपनीत अग्निशमन यंत्रणेच्या देखभाल कामादरम्यान कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) गॅसची गळती होऊन झालेल्या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला. तर, एकावर उपचार सुरू आहेत. ही घटना मंगळवारी (दि.९) दुपारी साडेबाराच्या सुमारास तळेगाव एमआयडीसी फेज-१ येथील शाफलर इंडिया कंपनीत घडली..



गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात अशी मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर, प्रमोद जैस्वार यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दुर्घटनेच्या वेळी शाफलर कंपनीचे कर्मचारी कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे देखील घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनाही किरकोळ स्वरूपाचा त्रास झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव एमआयडीसी येथील शाफलर इंडिया कंपनीतील अग्निशमन सिलिंडरच्या देखभाल आणि तपासणीचे काम उषा फायर सर्व्हिसेसच्या कर्मचाऱ्यांकडून सुरू होते. यावेळी गौरीशंकर शर्मा, वैभव थोरात, प्रमोद जैस्वार, कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे काम करत होते. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अग्निशमन सिलिंडरमधून अचानक $CO_2$ गॅसची गळती सुरू झाली. गॅसचा प्रादुर्भाव वाढल्याने तीन कर्मचारी बेशुद्ध पडले.

घटनेची माहिती मिळताच सहकाऱ्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. बेशुद्ध झालेल्या कर्मचाऱ्यांना उपचारासाठी पवना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात यांना तपासून मृत घोषित केले. प्रमोद जैस्वार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

या घटनेनंतर कंपनी परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. दुर्घटनेची माहिती मिळताच तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून गॅस गळती नेमकी कशामुळे झाली, सुरक्षा उपाययोजनांमध्ये काही त्रुटी होत्या का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मोफत पाठ्यपुस्तक वाटप सुरू

## 1 ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना लाभ, आकुर्डी आणि पिंपरी केंद्रांवर शाळांची गर्दी; 8 ते 12 जूनदरम्यान वितरण प्रक्रिया सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील महापालिका, खासगी आणि अनुदानित शाळांना पाठ्यपुस्तकांच्या संचांच्या वाटपाची सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापकांनी आकुर्डी आणि पिंपरीच्या वितरण केंद्रांवर पुस्तकांचे संच घेण्यासाठी गर्दी केली होती.

पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण विभागामार्फत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या आदेशानुसार, तसेच बालभारती, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेली इयत्ता 1 ली ते 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठीची मोफत पाठ्यपुस्तके 8 ते 12 जून या कालावधीत वितरित करण्यात येणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील शाळांना इयत्ता 1 ली ते 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांच्या वितरणासाठी आकुर्डीतील वसंतदादा पाटील मनपा शाळा व पिंपरी वाघिरेतील कर्मवीर भाऊराव पाटील मनपा शाळा ही वितरण केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था शाळा, शासकीय शाळा, खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येईल.महाराष्ट्राचा पर्यटन मार्गदर्शक

शैक्षणिक वर्ष 2026-27 च्या प्रारंभीच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत व शाळेच्या पहिल्या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पाठ्यपुस्तक असावे, यासाठी शिक्षण विभागाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

तथापि, खासगी अनुदानित शाळांमधील स्वयंअर्थसहाय्यित तुकड्यांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जाणार नाहीत, याची संबंधित शाळांनी नोंद घ्यावी. सर्व मुख्याध्यापकांनी नियोजित वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तकांचा ताबा घेऊन विद्यार्थ्यांना वेळेत वितरण करावे, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.



### मुख्याध्यापकांना वेळेत वितरणाचे आवाहन

» शिक्षण विभागाने सर्व मुख्याध्यापकांना नियोजित वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तकांचा ताबा घेऊन विद्यार्थ्यांना त्वरित वाटप करण्याचे आवाहन केले आहे. मात्र खासगी अनुदानित शाळांतील स्वयंअर्थसहाय्यित तुकड्यांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पाठ्यपुस्तकांचे वेळेत वितरण झाल्यास विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाची सुरुवात अधिक आत्मविश्वासाने करता येईल. त्यामुळे पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### दोन केंद्रांवर पुस्तक वितरण व्यवस्था

» पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण विभागाने इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक वितरण मोहीम सुरू केली आहे. आकुर्डीतील वसंतदादा पाटील मनपा शाळा आणि पिंपरी वाघिरे येथील कर्मवीर भाऊराव पाटील मनपा शाळा ही दोन प्रमुख वितरण केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर मुख्याध्यापकांनी पुस्तकांचे संच स्वीकारण्यासाठी मोठी गर्दी केली. महापालिका, शासकीय, खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून शिक्षण विभागाने वितरणासाठी विशेष नियोजन केले आहे.

### पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके

» शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना आवश्यक पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी शिक्षण विभागाने वेळेत वितरणाची प्रक्रिया राबविली आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आणि बालभारतीकडून प्राप्त झालेली पुस्तके ८ ते १२ जून या कालावधीत शाळांना दिली जाणार आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पाठ्यपुस्तक असावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळून अभ्यासक्रमाची सुरुवात वेळेत होण्यास मदत होणार आहे.

# फुगेवाडी विषारी दारू प्रकरणातील दाखल तीन रुग्ण मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर

## वायसीएम रुग्णालयातील तातडीच्या उपचारांमुळे रुग्णांना मिळाले नवजीवन

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात बाधित तीनही रुग्णांची प्रकृती आता पूर्णपणे सुधारली असून त्यांना आज यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार या सर्व रुग्णांवर संपूर्णपणे मोफत उपचार करण्यात आले.

विषारी दारू सेवनामुळे गंभीर स्थितीत रुग्णांना वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात दाखल होताच तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू करण्यात आले. तसेच आवश्यक वैद्यकीय चाचण्या, औषधोपचार आणि विशेष निगा पुरविण्यात आली. रुग्णांच्या नातेवाईकांनाही वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि आवश्यक औषधोपचार यांच्या मदतीने रुग्णांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली.

सदर रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत वायसीएम रुग्णालयाच्या मेडिसिन विभागाने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विभागातील अनुभवी डॉक्टरांनी रुग्णांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवत आवश्यक उपचार पद्धतींचा अवलंब केला. ज्यामुळे आता सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर झाली असून ते पूर्णपणे बरे होऊन निरोगी अवस्थेत घरी परतत आहेत.




> विषारी दारू प्रकरणातील बाधित रुग्णांना तातडीने आणि सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी महापालिकेने आवश्यक त्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या. सर्व रुग्णांची प्रकृती सुधारून त्यांना घरी जाता येत आहे, ही समाधानाची बाब आहे. वायसीएम रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महानगरपालिका.

> विषारी दारू प्रकरणातील रुग्णांची स्थिती लक्षात घेऊन त्यांच्यावर तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपचार करण्यात आले. विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी समन्वयाने काम करत रुग्णांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले. वैद्यकीय विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर केलेल्या उपचारांमुळे सर्व रुग्णांची प्रकृती पूर्णपणे सुधारणे शक्य झाले.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका..

# समाविष्ट गावांतील मिळकतकर कमी करण्याची मागणी; स्थायी समितीकडे प्रस्ताव

## वाजवी भाडेदरात 35 टक्के कपात आणि ग्रामपंचायत नोंद असलेल्या मिळकतींना एकपट कर आकारणीची शिफारस

**पुणे | प्रतिनिधी**

'महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांतील मिळकतींच्या वाजवी भाडेदरामध्ये ३५ टक्के कपात करून करआकारणी करावी. तसेच, ग्रामपंचायतीकडे नोंद झालेल्या मिळकतींना एकपट कर आकारणी करावी,' असा प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नगरसेवकांकडून स्थायी समितीला देण्यात आला आहे. त्यावर स्थायी समितीच्या पुढील बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

महापालिकेतील विरोधी पक्षनेते अॅड. नीलेश निकम आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) गटनेते सोपान उर्फ काका चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी नगरसेवक दत्तात्रय धनकवडे, सुहास टिंगरे, अजित घुले आदी उपस्थित होते.

निकम म्हणाले, 'समाविष्ट ३२ गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या कराच्या दुप्पट होणार नाही, अशा पद्धतीने मिळकतकर आकारणीच्या राज्य शासनाच्या सूचनेवर महापालिकेने अद्यापही निर्णय घेतलेला नाही. समाविष्ट गावातील कर अधिक असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केल्यामुळे राज्य सरकारने थकबाकी वसुलीला स्थगिती दिली आहे. तसेच, सर्वसाधारण सभेत हा मुद्दा चर्चेला आल्यानंतर महापौर मंजूषा नागपुरे यांनी सर्वपक्षीय समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. त्याचीही अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे हा प्रस्ताव देण्यात आला आहे.

'समाविष्ट गावांतील मालमत्तांच्या कर आकारणीसाठी वापरल्या जाणाऱ्या वार्षिक भाडेदरामध्ये ३५ टक्क्यांपर्यंत कपात करून सुधारित दर निश्चित करण्याची शिफारस प्रस्तावाद्वारे करण्यात आली आहे. समाविष्ट ३२ गावांचे स्वतंत्र विभाग करून परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मधील दरांमध्ये ३५ टक्के कपात करून वार्षिक भाडे मूल्य निश्चिती करावी. मोकळे भूखंड, मोबाईल टॉवर्स आणि आयटी मालमत्ता यांना या सवलतीतून वगळले आहे.



### सरकारी सूचनांच्या अंमलबजावणीची मागणी

» विरोधी पक्षनेते अॅड. नीलेश निकम यांनी सांगितले की, समाविष्ट गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या कराच्या दुप्पट कर आकारला जाणार नाही, अशी राज्य शासनाची सूचना असूनही त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. कर अधिक असल्याच्या तक्रारींमुळे राज्य सरकारने थकबाकी वसुलीला स्थगिती दिली आहे. तसेच सर्वपक्षीय समिती स्थापन करण्याचे आश्वासनही अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे नागरिकांच्या हितासाठी हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून न्याय्य करप्रणाली लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### करसवलतीमुळे नागरिकांना दिलासा

» महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील नागरिकांना मिळकतकरात दिलासा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी स्थायी समितीकडे महत्त्वाचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार वाजवी भाडेदरामध्ये ३५ टक्के कपात करून करआकारणी करावी, तसेच ग्रामपंचायतीकडे नोंद असलेल्या मिळकतींना एकपट कर लावावा, अशी मागणी करण्यात आली आहे. समाविष्ट गावांतील वाढलेल्या करांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्याने हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास हजारो मालमत्ताधारकांना मोठा आर्थिक दिलासा मिळू शकतो.

### ३२ गावांसाठी स्वतंत्र कररचना सुचवली

» प्रस्तावात समाविष्ट गावांचे स्वतंत्र विभाग करून परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मधील वार्षिक भाडेदरामध्ये ३५ टक्के कपात करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच बिल्टअप क्षेत्राच्या केवळ १५ टक्के क्षेत्राला चटई क्षेत्र मानून कर आकारणी करण्याची तरतूद सुचवण्यात आली आहे. ग्रामपंचायत नोंद नसलेल्या मालमत्तांसाठी वीजबिल, शॉप अॅक्ट किंवा अन्य अधिकृत कागदपत्रांच्या आधारे कर निश्चित करण्याचा पर्यायही प्रस्तावात देण्यात आला आहे. यामुळे कर आकारणी अधिक वास्तववादी आणि नागरिकाभिमुख होईल, असा दावा करण्यात आला आहे.

# सोमवारपासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा; महापौरांची मोठी घोषणा

## महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक संपन्न; शहरात लवकरच सुरु होणार 'सेव्ह वॉटर' मोहीम.

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील पाणीसाठ्याने तळ गाठला असून, चार धरणांमध्ये केवळ ५ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. हे पाणी ऑगस्टअखेर राखीव ठेवावे लागणार असल्याने शहरात येत्या सोमवार (१५ जून) पासून दिवसाआड पाणी दिले जाणार आहे. त्यासाठीचे पूर्ण नियोजन करण्यासाठी प्रशासनास पुढील काही दिवस दिले जाणार असून,

याबाबतचा निर्णय पुढील दोन दिवसांत जाहीर केला जाणार असल्याची माहिती महापौर मंजुषा नागपुरे यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना दिली. उपमहापौर परशुराम वाडेकर, आयुक्त नवल किशोर राम, सभागृह नेते गणेश बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काका चव्हाण या वेळी उपस्थित होते.

अल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात सरासरीपेक्षा ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडण्याची तब्बल ६० टक्के शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. जून महिना सुरू होऊनही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर महापौर नागपुरे यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून शहराच्या पाणीपुरवठा नियोजनाचा आढावा घेतला.

बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी दिवसाआड पाणीकपात लागू करण्याचा निर्णय जवळपास निश्चित झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले, तसेच शहरात सेव्ह वॉटर मोहीम राबविली जाणार असून, त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महापौरांनी केले आहे.

खडकवासला धरणसाखळीत ५ (१७ टक्के) टीएमसी पाणी शिल्लक आहे. त्यातील ०.८० टीएमसी पाणी पालखीसाठी सोडले जाणार आहे. काही पाण्याचे बाष्पीभवन होणार आहे, तर महापालिकेस दिवसाआड पाणीपुरवठा करायचा झाल्यास या पाण्यातील तीन ते सव्वातीन टीएमसी पाण्याची गरज असेल. महापालिका सध्या धरणातून प्रतिदिन १५५० एमएलडी पाणी घेत असून, ते दिवसाआड कपातीनंतर १ हजार एमएलडी प्रतिदिन घेतले जाणार आहे. त्यामुळे ते शहराला दिवसालाआड दिल्यास प्रत्येक भागास पुरेसे पाणी मिळणार आहे.



> "मे महिन्यातील उष्णतेमुळे नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून पाणी कपातीचा निर्णय टाळण्यात आला होता. मात्र, मान्सून लांबण्याची शक्यता असल्याने उपलब्ध साठा जपण्यासाठी कठोर उपाययोजना आवश्यक झाल्या आहेत. नागरिकांनी प्रशासनाच्या सेव्ह वॉटर मोहिमेला सहकार्य करावे."
> - मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे महापालिका

# रस्ते प्रकल्पांना विरोध करणाऱ्यांवर कारवाई

## पीएमआरडीए महानगर आयुक्तांचे आदेश, खेड तालुक्यातील प्रकल्पांचा घेतला प्रत्यक्ष आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी खेड तालुक्याचा विस्तृत दौरा करून विविध महत्त्वपूर्ण रस्ते व पायाभूत सुविधा प्रकल्पांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन सविस्तर पाहणी केली. प्रादेशिक दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रस्त्यांच्या कामाला गती देणे आणि प्रलंबित भूसंपादनातील अडचणींचा आढावा घेणे, हा या पाहणी दौऱ्याचा मुख्य उद्देश होता.

या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमध्ये कोणतेही अडथळे येऊ नयेत, यासाठी जे घटक किंवा व्यक्ती भूसंपादन, मोजणी अथवा शासकीय कामात जाणूनबुजून असहकार्य करत आहेत, त्यांच्याविरुद्ध तातडीने कायदेशीर व कडक प्रशासकीय आदेश जारी करून कठोर कारवाई करण्याचे निर्देशही महानगर आयुक्तांनी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिले. तसचे चाकण व परिसरातील तीव्र वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी अभियांत्रिकी विभागाने सर्व प्रशासकीय व समन्वयातील अडचणी तात्काळ दूर करून या प्रलंबित प्रकल्पांचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, असे स्पष्ट आदेश महानगर आयुक्तांनी दिले.



या दौऱ्यादरम्यान महानगर आयुक्तांसोबत मुख्य अभियंता (प्रभारी) शिवप्रसाद बागडी, अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रभारी सहआयुक्त हिम्मत खराडे, सहमहानगर नियोजनकार श्वेता पाटील, सहायक नगररचनाकार सुजित पानसरे, कार्यकारी अभियंता शिवकुमार कुपल आदींसह 'पीएमआरडीए'चे इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महानगर आयुक्तांनी खेड तालुक्यातील एकूण सात प्रमुख मार्गांची सविस्तर पाहणी केली. ज्यामध्ये देहू-येळवाडी रस्ता, तळेगाव-चाकण महामार्गावरील हिंगणे चौक ते फॉक्सवॅगन कंपनी रस्ता (३० मीटर डीपी रस्ता), मौजे नाणेकरवाडी येथील सॅनी कंपनी ते समृद्धी सीएनजी पंप रस्ता (१५ मीटर डीपी रस्ता), बंगला वस्ती चौक ते रासे फाटा रस्ता (३६ मीटर डीपी रस्ता), वाकी बुद्रुक ते मेदणकरवाडी रस्ता (३० मीटर आरपी रस्ता), चाकण – तळेगाव महामार्ग संजीवनी हॉस्पिटल ते वाकी खुर्द (४५ मी. आरपी रस्ता चाकण नगर परिषद क्षेत्र) व भाम पुलाजवळील वेस्टर्न बायपास, एमआयडीसी फेज-५ ते पुणे – नाशिक रस्ता (४५ मीटर आरपी रस्ता) या महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश होता.

### चाकण वाहतूक कोंडीवर उपाययोजनांना वेग

**» चाकण आणि परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी प्रलंबित रस्ते प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश डॉ. चौधरी यांनी दिले. अभियांत्रिकी विभागाने सर्व प्रशासकीय, तांत्रिक आणि समन्वयातील अडचणी तात्काळ दूर करून कामांना गती द्यावी, असे त्यांनी सांगितले. नवीन रस्ते आणि बायपास मार्ग पूर्ण झाल्यानंतर वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असून उद्योग, नागरिक आणि मालवाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पांकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

### रस्ते प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी

**» पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी खेड तालुक्यातील सात महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. देहू-येळवाडी रस्ता, हिंगणे चौक ते फॉक्सवॅगन कंपनी मार्ग, नाणेकरवाडीतील डीपी रस्ता, बंगला वस्ती चौक ते रासे फाटा मार्ग, वाकी बुद्रुक ते मेदणकरवाडी रस्ता, चाकण-तळेगाव महामार्गावरील आरपी रस्ता आणि वेस्टर्न बायपास अशा महत्त्वाच्या मार्गांचा यात समावेश होता. या प्रकल्पांमुळे परिसरातील दळणवळण अधिक गतिमान होऊन औद्योगिक आणि नागरी विकासाला चालना मिळणार आहे.**

### भूसंपादनातील अडथळ्यांवर कठोर भूमिका

**» पायाभूत सुविधा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी भूसंपादन आणि मोजणी प्रक्रियेत अडथळे निर्माण करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश महानगर आयुक्तांनी दिले. शासकीय कामकाजात जाणूनबुजून असहकार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा घटकांविरोधात तातडीने कायदेशीर आणि प्रशासकीय पावले उचलण्यास त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. विकासकामांना विलंब होऊ नये आणि प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी प्रशासनाने समन्वय वाढवून कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे रखडलेल्या प्रक्रियांना वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

# पुण्यावर पुराचे संकट? नदीपात्रात मेट्रोचा राडारोडा आणि कचऱ्याचे ढीग

## अतिक्रमणे आणि मेट्रोच्या कामांमुळे पुण्यात पूरस्थितीचा धोका वाढला; एकतानगरी, शिवणे आणि रजपूत झोपडपट्टी परिसराला पुराचा वेढा बसण्याची भीती.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात मान्सून दाखल झाला असून, पुढील काही दिवसांत शहरात पावसाळा सुरू होणार आहे. मात्र, असे असतानाही शहरातून जाणाऱ्या मुठा नदीपात्रात दोन्ही बाजूस मोठ्या प्रमाणात राडारोडा तसेच कचरा पडून आहे. याशिवाय भिडे पुलाच्या परिसरात मेट्रोचे साहित्य आणि पुलाच्या कामासाठी नदीपात्रात करण्यात आलेला भराव तसाच असल्याने नदीतील पाण्यास अडथळे निर्माण होणार असून, पूरस्थितीची समस्या गंभीर होण्याची चिन्हे आहे.

मात्र, महापालिका, पाटबंधारे विभाग आणि महामेट्रोकडून याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. दरवर्षी पाटबंधारे विभागाकडून पावसाळ्यापूर्वी महापालिकेस पत्र पाठवित पात्रातील राडारोडा तसेच इतर अडथळे दूर करण्यासाठी सूचना केल्या जातात. मात्र, त्यांच्याकडूनही यंदा कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत.



शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला ही धरणे आहेत. यातील तीन धरणांतून खडकवासला धरणात पाणी येते आणि हे पाणी शहराला पिण्यासाठी सोडले जाते. या चारही धरणांची पाणी साठवण क्षमता २९.५० टीएमसी पाण्याची असली तरी खडकवासला धरणाची साठवण क्षमता केवळ १.७२ टीएमसी आहे. त्यातच, शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी या धरणात ५० टक्के पाणी राखीव ठेवावे लागते.

त्यामुळे पावसाळ्यात हे धरण सर्वात आधी भरते. त्यातच, धरणाची क्षमता कमी असल्याने इतर धरणात कमी पाणी असले तरी खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडावे लागते. खडकवासला धरणातून सर्वसाधारणपणे २५ ते ३० हजार क्युसेक पाणी सोडल्यानंतर डेक्कन तसेच सिंहगड रस्ता परिसरात पूरस्थिती उद्भवत होती.

### मेट्रोने अडविले नदीपात्र....

**» महामेट्रोकडून नारायण पेठ ते डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम तीन वर्षांपासून रडतखडत सुरू आहे. या कामासाठी नदीत मोठ्या प्रमाणात भराव टाकला आहे. तसेच, या पुलासाठी मोठे लोखंडी जोड पूलावर ठेवले असून, त्याच्या दोन्ही बाजूला लोखंडी बॅरिकेडस् लावले आहेत. तर पुलाखालून पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या जवळपास १५ मोऱ्यांमधील केवळ ५ मोऱ्या पाणी वाहून जाण्यासाठी शिल्लक राहिल्या आहेत. दहा मोऱ्या राडारोड्यात बुजून गेल्या आहेत.**